Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या मदतीला धावली युवासेना

(पान २ वर)



। गुरुवार, दि. २५ जून २०२६ । वर्ष १ । अंक ७८ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

» Selected

## शिंदखेड्यात घर व दुकानाला भीषण आग

**शिंदखेडा | प्रतिनिधी :** शिंदखेडा तालुक्यातील वाडी गावात घरासह हार्डवेअर व मोटर सर्व्हिस दुकानाला भीषण आग लागून सुमारे ८ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना बुधवारी रात्री घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेत आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. मिळालेल्या माहितीनुसार, वाडी येथील चतुर गांगजी गिरासे यांच्या मालकीचे पेडकाई माता पंक्चर हार्डवेअर अँड मोटर सर्व्हिस हे दुकान आणि घर एकाच ठिकाणी आहे. बुधवारी रात्री साडेनऊच्या सुमारास दुकान बंद करून कुटुंबीय झोपले होते. दरम्यान, रात्री सुमारे दहा वाजता दुकानातून धूर येत असल्याचे लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांची झोप उडाली. घाबरलेल्या कुटुंबीयांनी दुकानाचे शटर उघडून पाहिले असता दुकानात मोठ्या प्रमाणावर आग लागल्याचे दिसून आले. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण दुकानाला विळखा घातला.

### सोशल मीडियावर संतापाची लाट, सिया गोयलवर कठोर कारवाईची मागणी

# केतन अग्रवाल मृत्यू प्रकरणाने देश हादरला!

## प्रेमसंबंध, नियोजित विवाह आणि कथित कटामुळे प्रकरण चर्चेच्या केंद्रस्थानी

**जन सम्राट टाईम्स**

**पुणे : सिया गोयल या २० वर्षांच्या तरुणीने तिचा होणारा नवरा केतन अग्रवाल याची १८ जूनला लोहगडावरुन ढकलून देत हत्या केली. सियाला केतनशी लग्न करायचं नव्हतं त्यामुळे तिने हे धक्कादायक पाऊल उचललं. सिया गोयलचं चेतन चौधरी या तरुणावर प्रेम होतं. त्याच्या साथीनेच सियाने केतन अग्रवालला संपवलं आणि केतन सेल्फी काढताना पडला आणि मृत झाला असा बनाव रचला होता.**

पण सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पैलू तपासल्यानंतर हा अपघात नसून हत्या आहे हे समोर आलं. या घटनेमुळे महाराष्ट्र हादरला आहे. तर नेटकरीही या प्रकरणी विविध प्रकारे प्रतिक्रिया देत आहेत.१८ जून पूर्वी केतन आणि सिया हे दोघंही त्यांच्या लग्नाची तयारी करत होते. या वर्षी डिसेंबर महिन्यात त्यांचा विवाह होणार होता. राजस्थानातील उदयपूर या ठिकाणी पॅलेसही बुक करण्यात येणार होता. तसंच दोन्ही कुटुंबं उच्चभ्रू असल्याने दोन प्रायव्हेट विमानंही तयार ठेवण्यात येणार होती. या दोघांचाही फेब्रुवारी महिन्यात साखरपुडा झाला होता. पण सियाला चेतन चौधरी आवडत होता. त्यामुळे चेतनसह मिळून तिने केतनच्या हत्येचा कट आखला.



नेटकरी या प्रकरणावर व्यक्त होत आहेत आणि हे प्रकरण भयंकर आहे असंही मत नोंदवत आहेत. तसंच सियाला कठोरातली कठोर शिक्षा झाली पाहिजे अशीही मागणी करत आहेत. एका युजरने म्हटलंय, Bro is Handsome केतन सियावर किती प्रेम करत होता हे त्या दोघांच्या व्हिडीओ आणि फोटोंवरुच समजतं आहे. या सियाला आणखी काय हवं होतं? का त्याचा बळी घेतला? आणखी एक युजर म्हणाला, केतनच्या मृत्यूची स्टोरी भीतीदायक आहे. चार दिवसांपूर्वीही सियाने केतनला ढकलून देण्याचा प्रयत्न केला होता. तिच्यावर संशय घेण्याऐवजी जेव्हा तिने मिठी मारली तेव्हा केतनने तिचे आभार मानले होते. चार दिवसांनी हीच सिया आपल्याला मारणार आहे हे कुठे केतनला माहीत होतं. बापरे कल्पनाही करवत नाही इतकं प्रकरण भयंकर आहे. सियाला कळलं की ती एकटी केतनला ढकलू शकत नाही, म्हणून तिने बॉयफ्रेंडची मदत घेतली आणि दोघांनी मिळून त्याला मारलं. एखाद्याचं प्रेम किती आंधळं असतं हे या निमित्ताने समोर आलंय. केतन आणि सिया १८ जूनला लोहगडावर गेले होते. तिथे सियाचा प्रियकर चेतन चौधरीही आला होता. या दोघांनी केतनला ढकललं आणि त्याची हत्या केली.

### पोलिसांनी या प्रकरणाबाबत काय सांगितलं?

पोलीस तपासात सिया आणि चेतन या दोघांनी मिळून केतनची हत्या केल्याचे निष्पन्न झाले असले, तरी कड्यावरून केतनला नेमका धक्का कोणी दिला, याचा थांगपत्ता पोलिसांना अद्याप लागलेला नाही. घटनेच्या वेळी केतनच्या अगदी जवळ सिया होती, त्यामुळे तिने धक्का दिला की तिथे दबा धरून बसलेल्या चेतन चौधरीने त्याला दरीत ढकलले, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. केतनला मारायचा प्लॅन किमान एक आठवडा आधीच ठरला होता हे स्पष्ट झाले असले, तरी प्रत्यक्ष कड्यावरून ढकलणारा मुख्य आरोपी कोण, हे पोलीस तपासाच्या पुढील टप्प्यात समोर येण्याची अपेक्षा आहे. या घटनेबाबत सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

त्यानंतर सियाने केतन पाय घसरुन पडल्याचा बनाव रचला. केतनच्या घरातल्यांना फोन करुनही हेच सांगितलं. दुसऱ्या दिवशी म्हणजेच १९ जूनला सियाचा वाढदिवस होता. तिने केतनसाठी शोक व्यक्त करणारं भावनिक स्टेटस ठेवण्याचं ढोंगही केलं. त्यानंतर ती केतनच्या कुटुंबाला भेटायला आणि त्यांचं सांत्वन करायला गेली. सुरुवातीला केतनच्या घरातल्या वाटलं की सिया खरं बोलते आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# १३ वर्षांच्या निर्भीड पत्रकारितेचा गौरव!

## बापुसाहेब यांना 'आदर्श पत्रकार' पुरस्कार

**जन सम्राट टाईम्स**

**जामखेड | प्रतिनिधी:** जामखेड तालुक्यातील साकत गावचे भूमिपुत्र तथा युवा पत्रकार बापुसाहेब रावसाहेब घोडेस्वार यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल लोकमाता अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय 'आदर्श पत्रकार' पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे. त्यांच्या या निवडीमुळे जामखेड तालुक्यासह साकत गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त होणार सन्मान महाराष्ट्र राज्य यशवंत सेना आणि जय मल्हार शैक्षणिक व सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पुरस्कार ५ जुलै रोजी अहिल्यानगर येथे प्रदान करण्यात येणार आहे. तळागाळातील प्रश्नांना न्याय मिळवून देणारी पत्रकारिता गेल्या १३ वर्षांपासून बापुसाहेब घोडेस्वार यांनी पत्रकारिता क्षेत्रात सत्य, निर्भीड आणि निष्पक्ष भूमिका जपली आहे. जिल्हा, तालुका आणि ग्रामीण भागातील सामाजिक,



शैक्षणिक तसेच जनहिताच्या प्रश्नांना त्यांनी सातत्याने वाचा फोडली. सामान्य नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी पत्रकारितेचे प्रभावी माध्यम म्हणून उपयोग केला.

### घोडेस्वार यांचे अभिनंदन

समाजाभिमुख पत्रकारिता, लोकहिताच्या प्रश्नांवरील सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि जनसामान्यांच्या हक्कांसाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांची राज्यस्तरीय 'आदर्श पत्रकार' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव पुरस्कार जाहीर होताच जामखेड तालुका, साकत पंचक्रोशी तसेच विविध सामाजिक, मान्यवरांकडून बापुसाहेब घोडेस्वार यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# संभाव्य दुष्काळ रोखण्यासाठी आतापासून तयारी करा : स्वप्नील सोनवणे

## एल निनोच्या पार्श्वभूमीवर नानाश्री फाऊंडेशनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन!

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी:** यंदाच्या वर्षी एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये चिंता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, संभाव्य दुष्काळी परिस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घ्याव्यात, अशी मागणी नानाश्री फाऊंडेशनच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदनाद्वारे करण्यात आली. नानाश्री फाऊंडेशनचे अध्यक्ष स्वप्नील सोनवणे यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना प्रेरणादायी पुस्तक भेट देत एल निनोच्या पार्श्वभूमीवर शेतकरी हिताच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. चुकीच्या अफवा आणि अपुऱ्या माहितीमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याने प्रशासनाने अधिकृत व शास्त्रीय माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. निवेदनात जिल्हा माहिती कार्यालयामार्फत विशेष जनजागृती मोहीम राबविणे, दुष्काळ पूर्वतयारी आराखडा तयार करणे, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांबाबत कृषी विभागामार्फत मार्गदर्शन करणे, दर्जेदार बियाणे व खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देणे, जलसंधारण व जलपुनर्भरणाची



कामे युद्धपातळीवर राबविणे आणि गावनिहाय पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच पीक विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी, संभाव्य पीक नुकसानीसाठी तातडीच्या मदतीची व्यवस्था, जनावरांसाठी चारा व पाणी उपलब्धतेचा स्वतंत्र कृती आराखडा, चारा छावण्या व चारा बँकांची पूर्वतयारी, हवामान अंदाज व कृषी सल्ला गावपातळीपर्यंत पोहोचविणे आणि मनरेगा अंतर्गत जलसंधारण व रोजगारनिर्मितीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याची मागणीही करण्यात आली. यावेळी बोलताना स्वप्नील सोनवणे म्हणाले, "शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. एल निनोमुळे संभाव्य संकट निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने दुष्काळ जाहीर होण्याची वाट न पाहता पूर्वतयारीवर भर देणे आवश्यक आहे. योग्य वेळी नियोजन झाल्यास शेतकरी, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान टाळता येऊ शकते." जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित विभागांमार्फत आवश्यक बाबींचा विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# SIR प्रणालीबाबत जनजागृतीसाठी काँग्रेस व संविधान जागर अभियानाचा पुढाकार!

**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव | प्रतिनिधी :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस धरणगाव आणि संविधान जागर अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने SIR (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन) अर्थात विशेष सखोल मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास धरणगाव शहर व तालुक्यातील काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या



प्रास्ताविकात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष डॉ. व्ही. डी. पाटील यांनी SIR प्रणालीचे महत्त्व विशद केले. समाजातील अशिक्षित घटक, भटक्या-विमुक्त समाज, आदिवासी बांधव, महिला तसेच अल्पसंख्याक नागरिकांना या प्रक्रियेची योग्य माहिती मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या घटकांना मदत करून त्यांची नावे मतदार यादीत योग्य पद्धतीने नोंदविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संविधान जागर अभियानाचे पूर्णवेळ कार्यकर्ता निखिल रांजणकर यांनी उपस्थितांना SIR प्रणालीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह मतदार यादी तयार करण्यासाठी विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहीम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मतदारांनी स्वतःची तसेच कुटुंबातील सदस्यांची माहिती अद्ययावत ठेवावी. आवश्यक कागदपत्रांसह मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्या सहकार्याने प्रक्रिया पूर्ण करून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात निखिल रांजणकर यांचा परिचय सुनील सोनार यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन महेश पवार यांनी केले. या जनजागृती अभियानाच्या माध्यमातून मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# एकल महिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू!

## 535 महिलांच्या सन्मानाचा निर्णय



**जन सम्राट टाईम्स**

**कानळदा | प्रतिनिधी :** समाजातील एकल महिलांना सन्मान, आत्मविश्वास आणि सामाजिक आधार मिळावा या उद्देशाने कानळदा ग्रामपंचायतीने आयोजित केलेला एकल महिला मेळावा व कार्यशाळा अनेक महिलांच्या आयुष्यात नवी उभारी देणारा ठरला. 23 जून एकल महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात गावातील 535 एकल महिलांचा सन्मान करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आला. कार्यक्रमाला जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार स्मिताताई वाघ तसेच जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. एकल महिला ग्रामपंचायत सदस्या वासंती प्रभाकर राणे यांच्या हस्ते खासदार स्मिताताई वाघ यांचे स्वागत करण्यात आले, तर सरपंच तथा निवृत्त डीवायएसपी पुंडलिक सपकाळे यांच्या हस्ते करिष्मा नायर यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविकात सरपंच पुंडलिक सपकाळे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या एकल व विधवा महिलांच्या सक्षमीकरणासाठीच्या कार्याचा उल्लेख करत मेळाव्याचा उद्देश स्पष्ट केला. गावातील कोणत्याही एकल महिलेला रूढी-परंपरांच्या नावाखाली अपमानास्पद वागणूक दिली जाणार नाही, प्रत्येक शुभकार्यात त्यांना सन्मानाचे स्थान दिले जाईल आणि अशा महिलांचा अपमान करणाऱ्यांवर ग्रामपंचायतीमार्फत आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. यासंदर्भात ग्रामपंचायतीने अधिकृत ठराव मंजूर केल्याची माहितीही त्यांनी दिली. गावातील एकूण 535 एकल महिलांचा सन्मान करण्यात येणार असून त्यापैकी प्रातिनिधिक स्वरूपात 30 महिलांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. उर्वरित महिलांनाही ग्रामपंचायतीच्या वतीने सन्मानपत्र देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच एकल महिलांच्या शासकीय कागदपत्रांशी संबंधित अडचणी सोडविण्यासाठी ग्रामपंचायत प्रयत्नशील राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. सन्मानपत्र स्वीकारताना अनेक महिलांच्या भावना अनावर झाल्या. आयुष्यात प्रथमच समाजाने इतक्या सन्मानाने गौरव केल्याची भावना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत होती. खासदार स्मिताताई वाघ यांनी महिलांना धीर देत आत्मविश्वासाने जीवन जगण्याचा संदेश दिला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# ग्रामरोजगार सहाय्यकांचे प्रश्न निकाली काढणार - मंत्री भरत गोगावले

## मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्याचे शिष्टमंडळाला आश्वासन

**जन सम्राट टाईम्स**

**पारोळा | प्रतिनिधी :** राज्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि रोजगार हमी योजना (रोहयो) मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या या बैठकीत मानधन, सेवा संरक्षण, प्रशासकीय अधिकार आणि विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी ग्रामरोजगार सहाय्यकांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असल्याचे सांगत त्यांच्या प्रश्नांवर लवकरच दिलासादायक निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून विविध मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. बैठकीत ग्रामरोजगार सहाय्यकांच्या नियुक्ती व सेवा समाप्तीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सोपविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच विविध शासकीय कार्यालयांमध्ये काम करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन ग्रामरोजगार सहाय्यकांना शासकीय ओळखपत्र उपलब्ध करून देण्याचा निर्णयही तत्त्वतः मान्य करण्यात आला. ग्रामरोजगार सहाय्यकांच्या



मानधन वितरणातील विलंब, सेवा संरक्षण, नियुक्ती व बडतर्फीचे अधिकार, शासकीय ओळखपत्र तसेच इतर प्रशासकीय अडचणींवर बैठकीत सखोल चर्चा झाली. मंत्री गोगावले यांनी सांगितले की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) प्रभावीपणे राबविण्यात ग्रामरोजगार सहाय्यकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामपंचायत स्तरावर रोजगार हमी योजनेंतर्गत कामांची नोंद, मजुरांची माहिती, नियोजन आणि अंमलबजावणी यांसह अनेक जबाबदाऱ्या ते पार पाडत असल्याने शासन त्यांच्या मागण्यांकडे संवेदनशीलतेने पाहत आहे.

बैठकीत रोजगार हमी विभागाने ग्रामरोजगार सहाय्यकांच्या मानधनासंदर्भातील सद्यस्थितीचा आढावा सादर केला. राज्यातील सुमारे 22 हजार 473 ग्रामरोजगार सहाय्यकांसाठी 3 ऑक्टोबर 2024 च्या शासन निर्णयानुसार प्रतिमाह 8 हजार रुपये निश्चित मानधन, प्रोत्साहन भत्ता, प्रवास भत्ता आणि डेटा पॅक भत्त्याची तरतूद करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. निश्चित मानधनासोबत किमान कामकाजाचे निकषही स्पष्ट करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

### बैठकीत प्रशासकीय अडचणींवर सखोल चर्चा

विविध शासकीय कार्यालयांमध्ये काम करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन ग्रामरोजगार सहाय्यकांना शासकीय ओळखपत्र उपलब्ध करून देण्याचा निर्णयही तत्त्वतः मान्य करण्यात आला. ग्रामरोजगार सहाय्यकांच्या मानधन वितरणातील विलंब, सेवा संरक्षण, नियुक्ती व बडतर्फीचे अधिकार, शासकीय ओळखपत्र तसेच इतर प्रशासकीय अडचणींवर बैठकीत सखोल चर्चा झाली. बैठकीस राज्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संदीप माने, बाळासाहेब तायडे, राज्य सल्लागार तथा जिल्हाध्यक्ष सुरेश पाटोळे, उपाध्यक्ष दयानंद कांबळे, प्रवीण घवघवे, श्रावण बोकडे तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्ष उपस्थित होते.

# मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती आरक्षणासाठी कास्ट्राईब महासंघ आक्रमक!

## जुनी पेन्शन, अनुशेष भरती व कंत्राटी भरती रद्द करण्याचीही मागणी

जन सम्राट टाईम्स



**धुळे। प्रतिनिधी:** राज्यातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमधील आरक्षण तात्काळ लागू करावे, जुनी पेन्शन योजना पूर्वलक्षी प्रभावाने सुरू करावी तसेच कंत्राटी भरती धोरण रद्द करावे, या प्रमुख मागण्यांसाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य, जिल्हा शाखा धुळे यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या ७ मे २०२१ च्या निर्णयामुळे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले असून अनेक कर्मचारी न्याय्य हक्कांपासून वंचित राहिल्याचा आरोप महासंघाने निवेदनात केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा तसेच केंद्र शासनाच्या १५ जून २०१८ च्या परिपत्रकाचा दाखला देत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीवरील अडथळे दूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. महासंघाने कर्नाटक राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही पदोन्नतीतील आरक्षणाची अंमलबजावणी करावी, २९ डिसेंबर २०१७ व ७ मे २०२१ चे वादग्रस्त आदेश रद्द करावेत, सरळसेवा भरतीतील मागासवर्गीय अनुशेष तत्काळ भरावा आणि कंत्राटी नोकरभरती धोरण मागे घ्यावे, अशा मागण्या केल्या आहेत. याशिवाय वाहन चालक, परिचर व इतर पदांची भरती कंत्राटी पद्धतीऐवजी सरळसेवा भरतीद्वारे करावी, दिव्यांग विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावा, मानधनावरील कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करावे तसेच राज्यातील विविध विभागांतील पदकपात थांबवून वाढत्या लोकसंख्येनुसार नवीन पदनिर्मिती करावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शासनाने मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेऊन सामाजिक न्यायाची भूमिका अधोरेखित करावी, असे महासंघाने नमूद केले आहे. या मागण्यांबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष कृष्णा इंगळे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष दुर्गेश बोरसे, कार्याध्यक्ष संजय लोंढे, सचिव लक्ष्मीकांत चव्हाण, कोषाध्यक्ष प्रकाश पवार, महिला संघटक बबिता पटले यांच्यासह अनेक पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### मागासवर्गीय अनुशेष तत्काळ भरावा

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या ७ मे २०२१ च्या निर्णयामुळे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले असून अनेक कर्मचारी न्याय्य हक्कांपासून वंचित राहिल्याचा आरोप महासंघाने निवेदनात केला आहे. महासंघाने कर्नाटक राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही पदोन्नतीतील आरक्षणाची अंमलबजावणी करावी, २९ डिसेंबर २०१७ व ७ मे २०२१ चे वादग्रस्त आदेश रद्द करावेत, सरळसेवा भरतीतील मागासवर्गीय अनुशेष तत्काळ भरावा आणि कंत्राटी नोकरभरती धोरण मागे घ्यावे, अशा मागण्या केल्या आहेत.

# अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या मदतीला धावली युवासेना

जन सम्राट टाईम्स



**(धुळे) । प्रतिनिधी :** B.Voc अभ्यासक्रमातील SD-355 Java Programming-I या विषयात अल्प गुणांमुळे अनुत्तीर्ण ठरलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारीची दखल घेत युवासेनेने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरूंना निवेदन दिल्यानंतर संबंधित विषयाच्या उत्तरपत्रिकांची पुन्हा तपासणी करण्याचे तातडीचे आदेश देण्यात आले आहेत. धुळे शहरातील पी. आर. घोगरे विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी काही दिवसांपूर्वी युवासेनेचे जिल्हाप्रमुख योगेश मराठे यांची भेट घेऊन आपली समस्या मांडली होती. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित हा प्रश्न गांभीर्याने घेत युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ गाठून कुलगुरूंची भेट घेतली. युवासेनेच्या शिष्टमंडळाने B.Voc विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणी प्रक्रियेत काही तांत्रिक त्रुटी किंवा दोष असण्याची शक्यता व्यक्त केली. त्यानंतर कुलगुरूंनी तात्काळ सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागाला उत्तरपत्रिकांची पुनर्तपासणी करण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे हजारो विद्यार्थ्यांचे संभाव्य शैक्षणिक नुकसान टळणार असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. याशिवाय, तांत्रिक अडचणींमुळे पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज भरता न आलेल्या विद्यार्थ्यांनाही दिलासा मिळाला आहे. कुलगुरूंनी विद्यापीठाची संकेतस्थळ सेवा पुढील दोन दिवसांत सुरू करण्यात येईल आणि पुनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्यांना पाच दिवसांची अतिरिक्त मुदत दिली जाईल, अशी माहिती दिली. युवासेनेचे उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव अविष्कार भुसे यांच्या सूचनेनुसार शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनोज मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश पाटील, धुळे लोकसभा प्रमुख किशोर भोसले आणि इतर पदाधिकाऱ्यांनी हा पाठपुरावा केला. या वेळी युवासेनेचे जिल्हाध्यक्ष योगेश मराठे, जळगाव जिल्हाध्यक्ष रोहित कोगटा, धुळे शहराध्यक्ष अमित खंडेलवाल, नितीन धनगर, भूषण पाटील तसेच विद्यार्थी प्रतिनिधी नंदिनी कोळी, दिपाली शिंदे, धनश्री जोशी, हर्षल पाटील आणि सचिन साळुंखे यांच्यासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# पदोन्नतीतील आरक्षण लागू करण्याची मागणी

## कास्ट्राईब महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन




जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** राज्यातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमधील आरक्षण तात्काळ लागू करावे तसेच त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, या मागणीसाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, जिल्हा शाखा धुळे यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. निवेदनाद्वारे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याबरोबरच पदोन्नतीतील आरक्षणाचा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची मागणी करण्यात आली. सामाजिक न्याय आणि संविधानिक तरतुदींनुसार मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, अशी भूमिका महासंघाने मांडली. यावेळी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष दुर्गेश बोरसे, कार्याध्यक्ष संजय लोंढे, सचिव लक्ष्मीकांत चव्हाण, कोषाध्यक्ष प्रकाश पवार, महिला संघटक बबीता पटले, माया बिर्हाडगे, विजय निकुंभ, विशाल सांगळे, मोहनीश साने, संगिता दाभाडे, सुनिल ठाकरे, निता दाभाडे, मनिषा पाटील, कपिल चव्हाण, सचिन माळी, भरत माळी, जगदीश शिंदे, बिपीन धाकड, वृषभ कुवर यांच्यासह अनेक कर्मचारी उपस्थित होते. महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाने मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांची दखल घेऊन लवकरात लवकर आवश्यक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### या मान्यवरांची होती उपस्थिती

यावेळी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष दुर्गेश बोरसे, कार्याध्यक्ष संजय लोंढे, सचिव लक्ष्मीकांत चव्हाण, कोषाध्यक्ष प्रकाश पवार, महिला संघटक बबीता पटले, माया बिर्हाडगे, विजय निकुंभ, विशाल सांगळे, मोहनीश साने, संगिता दाभाडे, सुनिल ठाकरे, निता दाभाडे, मनिषा पाटील, कपिल चव्हाण, सचिन माळी, भरत माळी, जगदीश शिंदे, बिपीन धाकड, वृषभ कुवर यांच्यासह अनेक कर्मचारी उपस्थित होते. महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाने मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांची दखल घेऊन लवकरात लवकर आवश्यक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# शहापूरमध्ये काळाचा घाला; वीज कोसळून शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

जन सम्राट टाईम्स



**एरंडोल । प्रतिनिधी :** अमळनेर तालुक्यातील शहापूर येथे शेतात काम करत असताना अंगावर वीज कोसळून एका युवा शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मंगळवारी (दि. २३) दुपारी घडली. या घटनेमुळे शहापूर गावासह परिसरात शोककळा पसरली आहे. मृत शेतकऱ्याचे नाव राकेश रतिलाल पाटील (वय ३२) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राकेश पाटील हे आपल्या आईसह शेतात कामासाठी गेले होते.

यावेळी शेतात काही मजूरदेखील काम करत होते. दुपारी सुमारे १२ वाजेच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसाने अचानक जोर धरला. पावसापासून बचाव करण्यासाठी राकेश यांची आई आणि मजूर जवळच असलेल्या लिंबाच्या झाडाखाली आश्रयाला थांबले. दरम्यान, आपली दुचाकी सुरक्षित ठिकाणी उभी करण्याच्या उद्देशाने राकेश पाटील रस्त्याकडे गेले. मात्र, याचवेळी अचानक त्यांच्या अंगावर वीज कोसळली. विजेचा जबरदस्त फटका बसल्याने राकेश पाटील यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. एका क्षणात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे पाटील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शहापूर परिसरात या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत असून, मृत शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना शासनाकडून तातडीची आर्थिक मदत देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# माहिती अधिकार कायद्यावरील नवीन अधिसूचना मागे घ्या; महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मागणी!

## नव्या नियमांमुळे माहितीचा अधिकार कमकुवत होण्याची भीती

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ | प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाने १२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या माहितीचा अधिकार (RTI) कायद्यासंदर्भातील नवीन अधिसूचनेमुळे नागरिकांच्या माहिती मिळविण्याच्या घटनात्मक अधिकारावर गंभीर आघात झाला असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने केला आहे. ही अधिसूचना तात्काळ स्थगित करून मागे घ्यावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, माहितीचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (१) (अ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अविभाज्य भाग असून सर्वोच्च न्यायालयानेही विविध निर्णयांमधून त्याची स्पष्ट व्याख्या केली आहे. शासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि भ्रष्टाचाराविरोधातील लढ्यात माहितीचा अधिकार हे सर्वसामान्य नागरिकांचे प्रभावी शस्त्र ठरले आहे. मात्र, नव्या अधिसूचनेतील काही तरतुदींमुळे माहितीचा अधिकार कायदा अधिक गुंतागुंतीचा, खर्चिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विशेषतः अपील किंवा तक्रारीच्या सुनावणीदरम्यान वकिलांची मदत घेण्यास मनाई करणारी नियम २०(३) मधील तरतूद ही न्यायप्रवेशाच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणणारी असल्याची भूमिका पत्रकार संघाने मांडली आहे. तसेच अर्जदारांकडून ओळखपत्राची मागणी करणे, माहिती मागण्यामागील कारण विचारणे, पुनरावृत्ती अर्जांवर निर्बंध लादणे आणि विविध शुल्कांमध्ये वाढ करणे या तरतुदी माहिती अधिकाराच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासणाऱ्या असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या सर्व बाबींचा विचार करून शासनाने सदर अधिसूचना तात्काळ रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली. हे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे भुसावळ तालुकाध्यक्ष संघरत्न सपकाळे यांच्या वतीने भुसावळ प्रांताधिकारी यांना सादर करण्यात आले

### नागरिकांचे शस्त्र

निवेदनात म्हटले आहे की, माहितीचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (१) (अ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अविभाज्य भाग असून सर्वोच्च न्यायालयानेही विविध निर्णयांमधून त्याची स्पष्ट व्याख्या केली आहे. शासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि भ्रष्टाचाराविरोधातील लढ्यात माहितीचा अधिकार हे सर्वसामान्य नागरिकांचे प्रभावी शस्त्र ठरले आहे.

# समता सैनिक दलाची जळगाव जिल्हा बैठक संपन्न

## जळगाव जिल्ह्यात पूर्व, पश्चिम व मध्य असे तीन विभाग

जन सम्राट टाईम्स



**जळगाव। प्रतिनिधी :** समता सैनिक दलाच्या जळगाव जिल्हा पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक राज्याध्यक्ष धर्मभूषण बागुल यांच्या अध्यक्षतेखाली आणि राज्य संघटक विजय निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. बैठकीत संघटन विस्तार, प्रशिक्षण आणि वर्षभराच्या विविध उपक्रमांबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक राज्य संघटक विजय निकम यांनी केले. यावेळी राज्याध्यक्ष धर्मभूषण बागुल यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटनात्मक बांधणी, कार्यविस्तार आणि आगामी कार्यक्रमांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. बैठकीत जळगाव जिल्ह्यात संघटन अधिक प्रभावीपणे कार्यरत राहण्यासाठी जिल्ह्याचे पूर्व, पश्चिम आणि मध्य अशा तीन विभागांमध्ये विभाजन करून स्वतंत्र जिल्हा कार्यकारिण्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीतील प्रमुख निर्णय

* जळगाव जिल्ह्याचे पूर्व, पश्चिम आणि मध्य अशा तीन विभागांत विभाजन करून स्वतंत्र जिल्हा कार्यकारिण्या स्थापन करण्यात येणार.
* 3 जुलै 2026 रोजी चाळीसगाव येथे समता सैनिक दलाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी एकदिवसीय बौद्धिक प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येणार.
* 15 जुलै 2026 रोजी जळगाव मध्य विभागाची जिल्हा कार्यकारिणी निवडीसाठी बैठक होणार.
* 31 जुलै 2026 रोजी यावल येथे जळगाव पूर्व विभागाचा जिल्हास्तरीय मेळावा आयोजित करण्यात येणार.

जिल्ह्यात संघटन बळकट करण्यासाठी आणि सामाजिक कार्याचा विस्तार करण्यासाठी 2000 प्रशिक्षित सैनिक तयार करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. बैठकीस जळगाव जिल्हा पश्चिम विभागाचे जिल्हाध्यक्ष किशोर डोंगरे, जळगाव जिल्हा पूर्व विभागाचे जिल्हा मुख्य संघटक सुपडू संदानशिव, जळगाव महानगर अध्यक्ष मुकुंदराव भालेराव, ॲड. अनिल सोनवणे, सुकलाल पवार, ज्ञानेश्वर साळवे, अरुण खरे, अभिमान बाविस्कर, महेंद्र जाधव, विशाल पगारे, सतीश अडकमोल, अनिता कापुरे, संजय सपकाळे, गौतम सोनवणे, सुधीर संदानशिव, मकरुत पठाण, सरफराज तडवी, राजू वानखेडे, नितीन सुरवाडकर, प्रशांत गायकवाड, लताबाई पाथरवट, राहुल पाथरवट, प्रतिभा घोडेस्वार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार जळगाव जिल्हा पश्चिम विभागाचे जिल्हाध्यक्ष किशोर डोंगरे यांनी मानले.

# आधुनिक शेतीचा कानमंत्र: 'बिबिएफ' मुळे वाढणार उत्पादन

## उत्पादनात २० टक्क्यांपर्यंत वाढीचा दावा



जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी:** बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेती अधिक शाश्वत, उत्पादक आणि किफायतशीर करण्यासाठी आधुनिक कृषी अवजारांचा वापर अत्यावश्यक बनला आहे. याच अनुषंगाने कृषी विज्ञान केंद्र, ममुराबाद फार्म (जळगाव) येथील कृषी शक्ती व अवजारे अभियांत्रिकी विषय विशेषज्ञ इंजि. वैभव सूर्यवंशी यांनी शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेल्या 'बिबिएफ' (रुंद वरंबा व सरी टोकण) यंत्राचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या यंत्राच्या सहाय्याने पेरणी केल्यास पिकांच्या उत्पादनात १० ते २० टक्क्यांपर्यंत वाढ होत असून बियाणे, वेळ आणि मजुरी खर्चातही लक्षणीय बचत होत असल्याचे त्यांनी सांगितले. विविध पिकांसाठी उपयुक्त यंत्र ट्रॅक्टरचलित असलेल्या या यंत्राद्वारे कपाशी, सोयाबीन, मका, हरभरा, तूर, भुईमूग, मूग, उडीद, ज्वारी तसेच कांदा यांसारख्या पिकांची वरंब्यावर टोकण पद्धतीने अचूक पेरणी करता येते. स्वतंत्र खत व बीज पेटी, विविध बियाणांसाठी बदलता येणाऱ्या तबकड्या, गती नियंत्रण यंत्रणा आणि खोली नियंत्रित करणारी चाके ही या यंत्राची वैशिष्ट्ये आहेत. आंतरपीक आणि आंतरमशागतीचीही सुविधा प्रत्येक फणासाठी स्वतंत्र बीज व खत पेटी असल्यामुळे आंतरपीक पद्धती सहज राबवता येते. तसेच मुख्य सांगाड्यावर 'स्वीप' बसवून यंत्राचा वापर आंतरमशागतीसाठीही करता येतो. त्यामुळे एकाच यंत्रातून अनेक कृषी कामे करता येणे शक्य होते. जल व्यवस्थापनात प्रभावी बिबिएफ तंत्रज्ञानामुळे कमी पावसात वरंब्यामध्ये ओलावा टिकून राहतो, तर अतिवृष्टी झाल्यास अतिरिक्त पाणी सरीतून बाहेर निघून जाते. त्यामुळे पिकांचे नुकसान कमी होते आणि मुळांची वाढ अधिक चांगली होते. खर्चात बचत, उत्पादनात वाढ या यंत्रामुळे पारंपरिक पेरणीच्या तुलनेत ३० ते ४० टक्के खर्चात बचत होत असून बियाण्यांचा अचूक वापर होतो. यंत्राची कार्यक्षमता ०.३३ ते ०.३६ हेक्टर प्रतितास इतकी असल्याने कमी वेळेत अधिक क्षेत्राची पेरणी शक्य होते. यंत्र वापरताना घ्यावयाची काळजी पेरणीपूर्वी शेताची योग्य मशागत करणे, ट्रॅक्टरचा वेग ३ ते ५ किमी प्रतितास ठेवणे, बीज व खत पेटी वेळोवेळी भरलेली ठेवणे तसेच कामानंतर यंत्राची स्वच्छता व ग्रीसिंग करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले आहे. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून उत्पादनवाढीसोबतच खर्च नियंत्रणावर भर द्यावा, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# वसतिगृहातील 22 विद्यार्थिनींवर विषप्रयोगाचा प्रयत्न

## कंत्राटी महिला शिपायाविरुद्ध गुन्हा दाखल; विधिमंडळात तीव्र पडसाद उमटले

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार : । प्रतिनिधी:** नंदुरबार येथील होळ तर्फ हवेली शिवारातील सामाजिक न्याय विभागाच्या महिला वसतिगृहात एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक प्रकार उघडकीस आला आहे. वैयक्तिक वादातून वसतिगृहातील २२ विद्यार्थिनींवर विषप्रयोग करून त्यांना ठार मारण्याचा कट रचला गेल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी एका कंत्राटी महिला शिपायाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात आणि विधिमंडळात तीव्र पडसाद उमटले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंत्राटी महिला शिपायाने वसतिगृहातील स्वयंपाक करणाऱ्या महिला कर्मचाऱ्याला हाताशी धरून, विद्यार्थिनींच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीत विष टाकून त्यांना जीवे मारण्याचा कट रचला होता. मात्र, स्वयंपाकी महिलेने रविवारीच हा प्रकार विद्यार्थिनींच्या कानावर घातला.

त्यानंतर या संदर्भातील एक कथित फोन संभाषण ऑडिओ क्लिप समोर आल्याने प्रकरणाला गंभीर वळण मिळाले. या क्लिपमध्ये



### विधिमंडळाच्या अधिवेशनात घुमला आवाज

या प्रकरणाचे पडसाद विधिमंडळ अधिवेशनातही उमटले. आमदार चित्रा वाघ यांनी विधानपरिषदेत हा प्रश्न उपस्थित करून विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा गंभीर मुद्दा उचलून धरला. यावर तातडीने दखल घेत सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांनी नंदुरबारचे सहाय्यक समाजकल्याण आयुक्त सुंदरसिंग वसावे यांना कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

विद्यार्थिनींच्या पाण्यात विष मिसळण्याचा कट स्पष्टपणे ऐकू येत असल्याचे बोलले जात आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विद्यार्थिनींचे ठिय्या आंदोलन केले. या प्रकारामुळे भयभीत झालेल्या नर्सिंग, आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या २२ विद्यार्थिनींनी थेट सामाजिक न्याय विभागाचे आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची भेट घेण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी सकाळी या विद्यार्थिनींनी वंचित बहुजन आघाडीचे तळोदा तालुकाध्यक्ष विशाल सामुद्रे यांच्या नेतृत्वाखाली नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार ठिय्या आंदोलन केले आणि दोषींवर तात्काळ कडक कारवाईची मागणी केली. घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी डॉ. मित्तली सेठी यांनी तात्काळ संबंधित कंत्राटी महिला शिपायाविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले. या आदेशानंतर नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात रात्री उशिरा संबंधित महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील कारवाई करत आहेत. तसेच, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त सुंदरसिंग वसावे यांनी या कंत्राटी शिपाई महिलेला सेवेतून मुक्त केल्याची माहिती दिली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306